महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

## दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा -२०२०

**अधिसूचना क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/तीन** **जाहिरात क्रमांक : ०६/२०२१**

जाहिरात क्रमांक ०१/२०२०, दिनांक ३ जानेवारी, २०२० नुसार आयोगामार्फत दिनांक **१** मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२० च्या दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालाआधारे, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मुख्य परीक्षा २०२० शनिवार दिनांक २५ सप्टेंबर , २०२१ रोजी औरंगाबाद, मुंबई व नागपुर या जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल.

**२. एकूण पदसंख्या :- ७४**

**३. पात्रतेचे निकष :-**

**३.१** भारतीय नागरिकत्व

**३.२** वयोमर्यादा, अर्हता, अनुभव, इत्यादी :-

| अ.क्र. | पात्र प्रवर्ग | दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वय | | | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | | | |
| | | अमागास/ मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | | |
| १ | नवीन विधी पदवीधर | २१ | २५ | ३० | **(१)** विधी शाखेतील पदवी. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असली पाहिजे आणि **(२)** विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (LL.M.)किमान ५५ %इतक्या गुणांनी दिनांक ३ जानेवारी, २०२०रोजी किंवा त्यापूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक | -- |
| २ | वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता | २१ | ३५ | ४० | विधी शाखेतील पदवी | **(१)**मुंबई उच्च न्यायालय किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव. **(२)**पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल |
| ३ | सेवा कर्मचारी (Ministerial Staff) :- उच्च न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य, मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक आणि त्यापेक्षा उच्च पदावर काम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य, उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील सेवा कर्मचारी वर्गाचे (Ministerial Staff) सदस्य | २१ | ४५ | ५० | विधी शाखेतील पदवी | विधी पदवी प्राप्तीनंतर दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी किंवा तत्पूवी किमान ३ वर्षांची सेवा झालेली असणे आवश्यक आहे. |

**३.३ मराठी भाषेचे ज्ञान** :-

**३.३.१** मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

**३.३.२** मराठी भाषेच्या ज्ञानाबददल खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१) ॲटर्नी किंवा अधिवक्ता - संबंधित जिल्हयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश.

(२) नवीन विधी पदवीधर- विधी अभ्यासक्रमासाठी (**LL.B./LL.M.**) नांव नोंदणी केली असलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा विद्यापीठ विभागाचे प्राचार्य/ प्रमुख.

(३) उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी—ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

(४) विशेष परिस्थितीत निवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांच्या पुनर्सेवाप्रवेशाद्वारे .

**३.३.३** मराठी भाषेविषयीची अर्हता धारण न करणा-या उमेदवारांच्या बाबतीत शासन नियमानुसार सहा महिन्यांच्या आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक.

**३.४ अनुभवाचा पुरावा** :-

अनुभवाबाबत खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

(१) वकीलांबाबत - जेथे उमेदवार प्रॅक्टिस करीत असेल त्या जिल्हयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश/मुख्य न्यायाधीश.

(२) सेवा कर्मचाऱ्यांबाबत - ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

**३.५ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक** :-

**३.५.१** सांविधिक विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे असे समजले जाईल.

**३.५.२** दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२० करीता दिनांक ०३ जानेवारी, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे **दिनांक ०३ जानेवारी, २०२०** रोजी संपादन केलेली शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अनुभव पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

**३.६ प्रमाणपत्राचे विहित नमुने** :-

**३.६.१** मराठी भाषेच्या ज्ञानाबाबत तसेच अनुभव प्रमाणपत्राचे विहित नमुने आयोगाच्या संकेतस्थळावर DOWNLOADS या सदरामध्ये उपलब्ध आहेत.

**३.६.२** आयोगाकडून वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार विहित नमुन्यातच अर्हता/पात्रतेसंदर्भात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**४.१** लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे जारी करण्यात आलेल्या 'लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींची परीक्षा आयोजित करण्याकरीता मार्गदर्शक सूचना २०१८ ' अनुसार तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या " दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना " चे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**५. निवड प्रक्रिया** :-

**५.१** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ अथवा त्यानंतर वेळोवेळी शासनाकडून करण्यात आलेल्या सुधारणा तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**५.२** पात्रतेसंदर्भात विहित अर्हता, अनुभव तसेच इत्यादी बाबी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असणार नाही.

**५.३** आयोगाने त्या त्या वेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असल्यासच त्याचा मुलाखत अथवा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

**६. संवर्ग / पदाबाबत सर्वसाधारण तपशील** :-

**६.१ सर्वसाधारण** :-

**६.१.१** वेतनश्रेणी : - (१) रुपये २७,७०० — ४४,७७० अधिक नियमानुसार देय इतर भत्ते. (२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**६.२** अंध उमेदवार सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**६.३** मा.उच्च न्यायालयाकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांकरीता अनुज्ञेय असलेले कोणतेही फायदे/सवलती देय नाहीत.

**६.४** कर्तव्ये व जबाबदाऱ्या :- प्रस्तुत संवर्ग / पदाच्या कर्तव्य व जबाबदा-या याबाबतचा संक्षिप्त तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**७. परीक्षेचे टप्पे** —

**७.१** प्रस्तुत मुख्य परीक्षा खालील दोन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

(१) मुख्य परीक्षा - २०० गुण

(२) मुलाखत - ५० गुण

**७.२** मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना इत्यादी संदर्भातील तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**७.३ मुख्य परीक्षा** :-

**७.३.१** परीक्षेचे स्वरुप :- पारंपरिक/वर्णनात्मक

**७.३.२** एकूण गुण. २००

**७.३.३** प्रश्नपत्रिका — दोन. प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर

**७.३.४** परीक्षेचे माध्यम- मराठी व इंग्रजी

**७.३.५ मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम** :-

**(अ) पेपर क्रमांक १** :- **(१)**सिव्हिल प्रोसिजर कोड **(२)**ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट **(३)** स्पेसिफिकरिलीफ ॲक्ट **(४)** लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

**(ब) पेपर क्रमांक २ :-**(१) इंडियन पिनल कोड (२) एव्हिडन्स ॲक्ट (३) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम-१९८९ व नागरी हक्क संरक्षण अधिनियम-१९५५ (५) कायदेविषयक ताज्या घडामोडीबाबत निबंध (अंदाजे ८०० शब्दांचा)

**७.४ मुख्य परीक्षेचा निकाल** :-

**७.४.१** यशस्वी उमेदवारांना उपलब्ध रिक्त पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच १:३ हे गुणोत्तर प्रमाण ठेवण्यासाठी निश्चित केलेले एकसमान अंतिम गुण ज्यांनी मिळविले असतील असे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**७.४.२** मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५०टक्के गुण मिळविणे ही किमान अर्हता राहील.

**७.४.३** महाराष्ट्र शासनाने सेवा प्रवेशाच्या प्रयोजनाकरीता मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक प्रश्नपत्रिके मध्ये किमान ४५ टक्के गुण मिळविणे ही मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र होण्यासाठी किमान अर्हता राहील.

**७.५** मुलाखत — **५०** गुण :- मुलाखतीमध्ये **४०** % अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल.

**७.६** अंतिम निवड :- लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

**८. प्रतीक्षा यादी :-**

प्रस्तुत पदाचा अंतिम निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष किंवा पुढील परीक्षेच्या अंतिम निकालाच्या दिनांकापर्यंत यापैकी अगोदर जे घडेल तो पर्यंत प्रतीक्षा यादी कार्यान्वित राहील.

**९. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही**:-

**९.१** न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल किंवा

**९.२** नैतिक अधोगतीचा समावेश असणा-या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल किंवा

**९.३** उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल किंवा

**९.४** उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल किंवा

**९.५** दोन पेक्षा अधिक मुले असतील.

**१०. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**१०.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**१०.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**१०.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**१०.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**१०.२** प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख ) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

**१०.३** प्रस्तुत पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

**१०.४.** प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

**११. मुख्य परीक्षेकरीता अर्ज करण्याची पद्धत :-**

**११.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे :-**

**११.१.१** आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

**११.१.२** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

**११.२** विहित प्रमाणपत्र/कागदपत्रे अपलोड करणे.

**११.२.१** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ७ | नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राची वैधता वाढविली असल्यास पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १३ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १४ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १६ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १७ | अनुभवाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १८ | राज्य शासकीय /बृहन्मुंबई महानगरपालिका/बेस्ट कर्मचारी यांच्याकरीता वयोमर्यादेतील सवलतीचा दावा असल्यास सादर करावयाचे प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

**११.२.२** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**११.२.३** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**११.२.४** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**११.२.५** उपरोक्त कागदपत्रांव्यतिरिक्त शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाच्या दाव्यासंदर्भातील शोधनिबंध, पुस्तके अथवा पुस्तकांमधील प्रकरणे, इत्यादीबाबतच्या स्वसाक्षांकित प्रती यांचा संच अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर ७ दिवसांच्या कालावधीमध्ये आयोगाच्या मुख्य कार्यालयामध्ये पोहोच होतील अशा रितीने सादर करणे अनिवार्य आहे.

**११.२.६** आयोगास पाठविण्यात येणा-या कागदपत्रांच्या संचावर पदाचे नांव, जाहिरात क्रमांक व अर्जाचा क्रमांक स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. त्याशिवाय संबंधित कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

**११.२.७** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**११.२.८** जिल्हा केंद्र निवड करणे.

**११.३ सर्वसाधारण :-**

**११.३.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**११.३.२** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**११.३.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**११.३.४** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.४ अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दिनांक ०६ ऑगस्ट, २०२१ ते २० ऑगस्ट, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**११.५ शुल्क :-**

**११.५.१** अमागास - ५४४/-

**११.५.२** मागासवर्गीय - ३४४/-

**११.५.३** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**११.५.४** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**११.६** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

**११.६.१** शुल्क भरण्याकरीता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

**११.६.२** 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

**११.६.३** 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील:- (**१**) ऑनलाईन पेमेंट (**२**) चलनाद्वारे

**११.६.४** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**११.६.५** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**११.६.६** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**११.६.७** चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**११.६.८** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.६.९** ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम **दिनांक २० ऑगस्ट, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**.

**११.६.१०** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम **दिनांक २१ ऑगस्ट, २०२१** - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

**११.७ जिल्हा केंद्र निवड :-**

**११.७.१** अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

**११.७.२** जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**१२. प्रवेशप्रमाणपत्र** :-

**१२.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१२.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**१२.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१२.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१२.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील '**उमेदवारांना सूचना** ' मधील ' **परीक्षा** ' विभागातील " **परीक्षा योजना**" सदराखाली ' **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा** ' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१४.** अधिसूचना जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : **०६ ऑगस्ट, २०२१**

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.